Golden Research Thoughts
ISSN 2231-5063
Impact Factor : 3.4052(UIF)
Volume-4 | Issue-7 |Jan-2015
Available online at www.aygrt.isrj.org

# अण्णा भाऊ साठे यांचे शाहिरी वाङ्मय

**डॉ. माधव बसवंते**

**सारांश**

पोवाडा आणि लावणीतून शाहिरी वाङ्मय अस्तित्वात आले आहे. शाहीर म्हणजे यवनी भाषेत कवी आणि शाहिरी म्हणजे काव्य. म्हणूनच पोवाडा व लावणीच्या रचनाकाराला शाहीर म्हणतात. अण्णा भाऊ साठे यांनी शाहिरी वाङ्मयाची नवी सजावट करुन तिचे नवे रचनाबंध स्वीकारले. अण्णा भाऊंनी आपल्या वास्तवाधिष्ठीत शाहिरीमध्ये नवा आशय भरुन तिला सजविले. समाज वास्तवतेचे आत्मभान देऊन समकालीन जीवनाची स्पंदने त्यात त्यांनी अचूकपणाने टिपली. शाहिर हा केवळ शाहीर नसतो, तर तो त्या त्या काळाचा प्रभावी भाष्यकार असतो, अशी अण्णा भाऊ साठे यांची स्पष्ट धारणा होती. याच धारणेतून त्यांनी धावत्या चलचित्रपद्धतीने समाजातील विलक्षण वास्तव आपल्या शाहिरीतून मांडले आहे. अण्णा भाऊंच्या शाहिरी वाङ्मयाची संख्या कमी असली, तरी त्यांच्या शाहिरीचा गुणात्मक दर्जा हा उच्च आहे. अण्णा भाऊ साठे यांनी आयुष्यभर जनतेची कदर केलेली आहे. जनतेवर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध त्यांनी घणाघाती प्रहार करीत तोफा डागीत होते. अण्णा भाऊंच्या शाहिरीतून त्यांच्या उच्च प्रतिभेचे दर्शन घडते. अण्णा भाऊ हे गाणारे हाडाचे शाहीर होते. त्यांच्या समग्र शाहिरीमध्ये क्रांतीचा एल्गार भरलेला आहे. अण्णा भाऊंनी आपल्या शाहिरीतून लोकशिक्षणाचा वस्तुपाठच देशापुढे ठेवला आहे. म्हणूनच अण्णा भाऊ साठे यांना त्या काळाचे वृत्तपत्रकार व इतिहास लेखक म्हणावे लागते.

**बीजसंज्ञा :** शाहिरी वाङ्मय, पोवाडे, लावणी, गीते, पद, गण, छक्कड.

**प्रस्तावना**

अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्याने मराठी साहित्य विश्वात नवा मानदंड निर्माण केला. दलित, श्रमिक, शोषित, उपेक्षित आणि वंचित माणसाला अण्णा भाऊंनी आपल्या साहित्यात केंद्रबिंदू मानले. म्हणूनच त्यांचे समग्र साहित्य संघर्ष आणि विद्रोहाने भारावलेले आहे. त्यांची साहित्यदृष्टी ही मानवी जीवनदृष्टींचा उत्कर्षबिंदू आहे. अण्णा भाऊंचा सामाजिक विचार व जीवनदृष्टी ही आंतरराष्ट्रीय पातळीवर समाज परिवर्तनाची एक मूलभूत दृष्टी म्हणून सिद्ध झालेली आहे.

अण्णा भाऊ साठे यांनी आपल्या शाहिरी वाङ्मयातून शोषित माणसांचा आवाज बुलंद केला. जातियवादी भारतीय समाज व्यवस्था आणि इंग्रजांच्या शोषक व्यवस्थेवरही त्यांनी अत्यंत आक्रमक भाषेत समाचार घेतला, हल्ला चढवला. महाराष्ट्रातील कामगारांना जागृत करुन त्यांना संघटीत करण्याचे काम अण्णा भाऊंच्या पोवाड्याने केले. अण्णा भाऊंनी आपल्या भाषेचा वापर दुधारी शस्त्राप्रमाणे केला. त्यांची भाषा जशी नम्र, विनयशील आहे, तशीच ती विद्रोही आणि बंडखोरही आहे. विषमता, अन्याय, अत्याचार संपवून नवसमाजनिर्मितीसाठी अण्णा भाऊंनी शाहिरी संघर्षाची व लढण्याची प्रेरणा देते. मूल्याधिष्ठीत समाजनिर्मितीसाठी अण्णा भाऊंनी शाहिरी विषमता व शोषण व्यवस्थेवर निकराचे हल्ले करीत परिवर्तनाच्या रणांगणात सज्ज झाली आहे.

**शाहिरी वाङ्मय म्हणजे काय ?**

शाहिरी वाङ्मय म्हणजे पोवाडे व लावण्या होय. पोवाडे हे शिवकालापासून तर लावण्या या उत्तर पेशवाईत जन्माला आल्या. पोवाडा हा निवेदनासाठी तर लावणी ही भाव-भावनांचा प्रभावी आविष्कार असतो. पोवाड्यात वीरपुरुषांचे पराक्रम, लढाया यांची वर्णने असतात. पोवाड्यांची रचना दीर्घ स्वरुपाची असते, तो अनेक चौका-चौकात विभागलेला असतो आणि त्यात प्रामुख्याने वीररस असतो. पोवाड्याचे स्वरुप निवेदनात्मक असते. तर याउलट लावणी ही पोवाड्यापेक्षा अधिक भावपूर्ण असते. प्रामुख्याने लावणी ही शृंगारिक

असते. पोवाडा व लावणी मिळून अस्तित्वात आलेल्या या शाहिरी वाङ्मयास 'लौकिक वाङ्मय' या नावानेही साहित्यविश्वात ओळखले जाते.

पोवाडा हा गद्य-पद्य अशा स्वरुपात असतो. त्यात अनेक पात्रे असतात. त्यात समर प्रसंगाचे वर्णन असते. लोकजागृती, प्रबोधन आणि मनोरंजन ही पोवाड्याची सर्वसामान्य उद्दिष्ट्ये असतात. याउलट लावणीत निवेदनापेक्षा भावना आविष्कार असते. लावणी ही प्रामुख्याने ताल ठेक्यात म्हणता येणाऱ्या एका भावगीताचीच रचना असते. शाहीर हे खऱ्या अर्थाने तत्कालीन सामाजिक जीवनाची माहिती देणारे बातमीदारच असतात. काल्पनिक रम्यतेपेक्षा वास्तविक समाजाचे चित्र शाहिरीतून स्पष्टपणे दिसून येते. तर ही लावणी ही आंबटशौकीन श्रोत्यांसाठी असल्याचे स्पष्टपणे जाणवते.

**अण्णा भाऊ साठे यांचे शाहिरी वाङ्मय**

अण्णा भाऊ साठे यांच्या शाहिरीवर सरकारची करडी नजर होती. त्यांच्या शाहिरीत कामगार, श्रमिक, शोषित, शेतकरी वर्गाची दृष्टी आहे. त्यांच्या शाहिरीत आपल्या वर्गांचा अभिमान आहे. मराठी भाषेचा, महाराष्ट्राचा आणि देशाचा अभिमान अण्णा भाऊंच्या शाहिरीतून प्रभावीपणे व्यक्त होतो. अण्णा भाऊंनी आपल्या शाहिरीचे व तमाशाचे लोकनाट्यात रुपांतर केले. त्यातून त्यांनी तमाशाकडे पाहण्याचा दृष्टिकोनच बदलून आदिशक्तीला जागर घातला. शृंगाररसाची सजावट केली, पण प्रारंभी देवदेवतांना वंदन करणारा दैववाद हद्दपार करुन त्यांनी तमाशाकडे पाहण्याचा दृष्टिकोनच बदलून आदिशक्तीला जागर घातला. शृंगाररसाची सजावट केली, पण प्रारंभी देवदेवतांना वंदन करणारा दैववाद हरद्दपार करुन त्यांनी श्रमशक्तीला आणि महापुरुषांना वंदन केले. म्हणूनच अण्णा भाऊंची शाहिरी ही जनतेतूनच स्फूरण पावली होती.

**अण्णा भाऊंचे पोवाडे**

अण्णा भाऊ साठे यांचा प्रकृतिपिंडच मार्क्सवादी शाहिरी बाण्याचा होता. त्यांनी आपल्या पोवाड्यातून विषमतावादी शोषण करणाऱ्या व्यवस्थेवर घणाघाती प्रहार केले. स्वाभिमानाने जगणाऱ्या श्रमिक कामगार वर्गाचा आवाज त्यांनी आपल्या पोवाड्यातून अजरामर केला. अण्णा भाऊंनी एकूण पंधरा पोवाडे लिहिल्याचे दिसून येत असले, तरी प्रत्यक्षात मात्र आज नऊच पोवाडेच उपलब्ध आहेत. सन १९४२ मध्ये लिहिलेला 'नानकिंग नगरापुढे' हा पोवाडा उपलब्ध नाही. त्यांचे उपलब्ध असणारे पोवाडे पुढीलप्रमाणे आहेत. स्टालिनग्राडचा पोवाडा (१९४२), बंगालची हाक (१९४४), बर्लिनचा पोवाडा (१९४६), पंजाब दिल्लीचा दंगा (१९४७), तेलंगणाचा संग्राम (१९४७), महाराष्ट्राची परंपरा (१९४७), अमळनेरचे अमर हुतात्मे (१९४७), मुंबईचा गिरणी कामगार (१९४९), काळ्या बाजाराचा पोवाडा (१९४९).

'स्टालिनग्राडचा पोवाडा' हा सात चौकांत असून प्रत्येक चौकाला स्वतंत्र चाल आहे. रशियन शहरावर नाझीने केलेल्या आक्रमणास रशियन सैन्य, नागरिक आणि महिलांनी अत्यंत धाडसाने व शौर्याने दिलेल्या लढ्याचे त्यात वर्णन आहे. बंगालमधील भीषण दुष्काळाचे चित्रण 'बंगालची हाक' या पोवाड्यात करण्यात आले आहे. 'बर्लिनचा पोवाडा' यातून रशियन सैन्याचा पराक्रम चित्रित झाला आहे. 'पंजाब दिल्लीचा दंगा' हा चार चौकात असून यात भारत-पाकिस्तान या दोन देशातील झालेली फाळणी आणि जातीय दंगे यावर आधारित असून या पोवाड्यातून अण्णाभाऊंनी समतेचे आवाहन केले आहे. 'तेलंगणाचा संग्राम' यातून निजामविरुद्धचा आंदोलनास पाठिंबा देणारा हा पोवाडा आहे. 'महाराष्ट्राची परंपरा' या पोवाड्यात अण्णा भाऊंनी महाराष्ट्रातील क्रांतिकारी, ऐतिहासिक, सांस्कृतिक, सामाजिक यासारख्या समृद्ध परंपरेचा आणि मराठी माणसांच्या अस्मितेचा विषय चित्रित केला आहे. 'अमळनेरचे अमर हुतात्मे' यात कॉम्रेड श्रीपती पाटील व त्यांच्या सहकाऱ्यांच्या धाडसाची स्तूती करण्यात आलेली आहे. इ.स. १९०८ ते १९५० पर्यंतच्या गिरणी कामगारांच्या जीवनाची ज्वलंत इतिहास 'मुंबईचा गिरणी कामगार' या पोवाड्यातून रेखाटला आहे. 'काळ्या बाजाराचा पोवाडा' हा भ्रष्ट नोकरशाही व राज्ययंत्रणा यांच्या छळाची, विषमतेची व शोषणाची वास्तवता सांगणारा हा अक्षर वाङ्मय पोवाडा आहे.

अण्णा भाऊ साठे यांच्या पोवाड्यातून मार्क्सवादी तत्त्वज्ञानाचे व लढ्याचे दर्शन होते. अन्यायाविरुद्ध माणसांनी पेटून लढण्याचे आवाहन करीत अण्णा भाऊंनी मानवतावादाच्या तलवारीला समाजवादाची धार चढवली आहे. अण्णा भाऊंची शाहिरी ही न्यायाची होती. सभ्यतेची होती. सुसंस्कृत समाज निर्मितीच्या स्वप्नाची होती. अस्पृश्यता, अन्याय आणि विषमतावादी व्यवस्थेची चिरंतर आग अण्णा भाऊंच्या मस्तकात पेटलेली होती. म्हणूनच त्यांचे पोवाडे हे क्रांतीची ज्वाला आहे.

**लावणी**

मराठी पद्य वाङ्मयात संत, पंत आणि तंत अशा प्रकारचे वर्गीकरण केले जाते. अण्णा भाऊ साठे हे शाहिरी परंपरेशी नाते सांगणारे आहेत. अण्णा भाऊंनी पोवाड्याबरोबरच लावणी, पदे, गीते, गण व छक्कड लिहिलेली आहेत. यात प्रामुख्याने शाहिरांनो,

कामगार स्तवन, गौळण, एकजुटीचा नेता, महाराष्ट्र देशा अमुच्या, उठला मराठी देश, तू मराठमोळा, महाराष्ट्रावरुन टाक ओवाळून, बोलत कडं कपारी, पूर्वला जाग आली, रवि आला लावूनी तुरा, शिवारी चला, भाग्याची माऊली, दुनियेची दौलत सारी, माझी मैना गावावर राहिली, जग बदल घालुनी घाव, तेलाशिवाय जाळतो दिवा, लवादाचा ऐका परकार, साताऱ्याची तऱ्हा, कटाव, जागणाराला या, कथा मुंबईची, मुंबईची लावणी, बाई मी बांगडी मैना, चिनी जनांची मुक्तीसेना, लेनिन शुभनामाचे, भारताची पहिली दीपावली या पद्यरचनांचा समावेश आहे.

'मुंबई लावणी' यातून अण्णा भाऊंनी मुंबईमधील विषमता, अन्याय, दारिद्र्य, शोषण याबरोबरच मुंबईच्या वैभवाचे आणि भव्यतेचे वर्णन केले आहे. 'माणसाला माणूस खातं । लुटलं आणि लुटलं जातं । तीस लाख लोक एका जागी राहती ।' अशा या मुंबईतील कमालीच्या विषमतेचे दर्शन अण्णा भाऊंनी दिले आहे. 'माझी मैना गावावर राहिली' ही लावणी त्यांनी 'छक्कड' या लेखन प्रकारात लिहिली आहे. ही लावणी अण्णा भाऊंच्या व्यंजक प्रतिभेचा साक्षात्कारी फुलोरा आहे. यात संयुक्त महाराष्ट्राचा लढा व विरहाचे दुःख आहे. यातून त्यांच्या तेजस्वी प्रतिभेचा धगधगता अंगार आणि भाषा सौंदर्याची साक्ष पटते. 'आता वळू नका। रणी पळू नका। कुणी चळू नका । बिनी मारायची अजून राहिली। माझ्या जिवाची होतिया काहिली।।' या 'छक्कड' मधील अण्णा भाऊंची तळमळ लक्षात येते. 'भारताची पहिली दिपावली' मधील बहीण ही केवळ भावालाच दीर्घायुष्य चिंतत नाही, तर भारताच्या स्वातंत्र्याचा दीप प्रज्वलीत करण्यासाठी अनेकांनी बलिदान दिले आहे, त्यामुळे स्वातंत्र्याचा हा दीप विझू न देण्याचे आग्रही आवाहन त्यांनी केले आहे. अण्णा भाऊंनी अखेरपर्यंत लोकांची कदर करीत आपल्या साहित्यातून लोकभावनांचा उद्‌गार केला. मानवी मूल्यांचा उद्‌घोष केला. अनैतिकतेचे बालेकिल्ले त्यांनी पूर्णतः उद्‌ध्वस्त करुन टाकले. सभ्यतेचा आग्रह धरीत सभ्यतेसाठी आणि मानवतेसाठी अण्णा भाऊंची लेखणी आग ओकत राहिली.

**निष्कर्ष**

- अण्णा भाऊ साठे हे वास्तवतेचे भान, श्रमाची महती आणि आंतरराष्ट्रीय जाणीव असलेले द्रष्टेलोकशाहिर होते.
- आपल्या शाहिरी कवनातून अण्णा भाऊंनी दलित, श्रमिक, शोषित जनतेच्या भावनांना उद्‌गार दिला.
- रशियन फौजेचा लढा हा जागतिक लोकशाहीच्या रक्षणासाठीचा लढा होता, हे अण्णा भाऊंनी 'बर्लिनचा पोवाडा' यातून स्पष्ट केले आहे.
- मार्क्सवादी तत्त्वज्ञान, नवभारताचे आंतरराष्ट्रीय संबंध, उदात्त मूल्यविचार व महाराष्ट्राच्या वैभवशाली परंपरेचे दर्शन अण्णा भाऊंच्या पोवाड्यातून होते.
- वेदनेचा शोध घेत घेत तिच्या बंदोबस्तासाठी वाचकाला कृतिशील व चिंतनशील बनविण्यासाठी अण्णा भाऊंची लावणी वाचक-प्रेक्षकांना आवाहन करते.
- अण्णा भाऊंनी आपल्या लावणीत लौकिक विषय व सामाजिक आशय भरुन मानवी जीवनातील विषमतेचे दर्शन देत व्यवस्था बदलण्यासाठी झुंज देण्याची प्रेरणा दिली.

**संदर्भ ग्रंथ**

१) शाहिर अण्णाभाऊ साठे, शाहीर (पोवाडे, लावण्या, गाणी), मनोविकास प्रकाशन, मुंबई.
२) डॉ. कऱ्हाडे सदा, अण्णा भाऊ साठे : व्यक्तिमत्त्व आणि कृतित्व, लोकसाहित्य प्रकाशन, औरंगाबाद.
३) गायकवाड आसाराम (संपा.), लोकशाहीर तथा लोकलेखक अण्णा भाऊ साठे संदर्भ ग्रंथ, झेप प्रकाशन, नाशिक.
४) कोरडे बजरंग, अण्णा भाऊ साठे (मराठी आवृत्ती), साहित्य अकादमी, , मुंबई.
५) गुरव बाबुराव, अण्णा भाऊ साठे : समाजविचार आणि साहित्यविवेचन, लोकवाङ्मय गृह, मुंबई.



**डॉ. माधव बसवंते**